# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



३३४ - २३ दिनांक : - २६/०९/२०२३

## १.८० लाख रुपये किंमतीचे गर्द (ब्राऊन शुगर) हा अंमली पदार्थ कब्जात बाळगणा-या आरोपीतास ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 यांना यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक २५/०९/२०२३ रोजी १४.१० वाजता नालासोपारा पश्चिम, हनुमान नगर, मैत्री अपार्टजवळ रोडवर इसम नामे - कुतबुद्दीन मुस्तफा काचवाला वय ३० वर्षे, रा. ए विंग, ३०१, रिलायबल प्रेस्टीज चंदननाका, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. हा आपले कब्जता १८ ग्रॅम वजनाचा १,८०,०००/- रुपये किंमतीचे गर्दा (ब्राऊन शुगर) नावाचा अंमली पदार्थासह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपीत विरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ४५५/२०२३ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २१(ब) प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास नालासोपारा पोलीस ठाणे करीता आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त साो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त साो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. प्रविण वानखेडे, सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी पार पाडली आहे.

********